ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 10 | July - 2016

International Online Multidisciplinary Journal
Review of Research
ISSN No : 2249-894X
Impact Factor : 3.1402 (UIF) [2015]
Save Tree, Save Paper, Save World

Review Of Research

# माध्यमिक स्तरावर हिंदी विषयासाठी भूमिकापालन प्रतिमानाद्वारे अध्यापन परिणामकारकतेचा अभ्यास

**श्री. पवार अमोल रामदास**
**पीएच.डी. संशोधक, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी**

***प्रस्तावना :–***

मनुष्य हा स्वभावतःच जिज्ञासू वृत्तीचा आहे. जेव्हा एखादी अपरिचित व अज्ञात अशी एखादी वस्तू, गोष्ट आपल्या नजरेस पडते तेव्हा आपल्याला त्याबद्दल उत्सुकता वाटते. आपली जिज्ञासू वृत्ती आपल्याला गप्प बसू देत नाही. त्या वस्तूचा शोध घेऊन तिच्याविषयी जास्तीत जास्त माहिती मिळविण्याचा प्रयत्न करतो. जिज्ञासा सर्व ज्ञानाची जननी आहे.



ज्ञानाचा उपयोग शिक्षक आपल्या अध्यापनात करत असतो. शालेय विषय शिकविताना शिक्षक विषयनिहाय अध्यापन पद्धतीचा अवलंब करत असतात. तसेच हिंदी विषय (किंवा भाषा विषय) शिकविताना शिक्षक प्रामुख्याने पारंपारिक पद्धत त्यामध्ये व्याख्यान, कथन, प्रवास, प्रकल्प, उद्गामी, अवगामी आणि तुलनात्मक अध्यापन पद्धतीच वापर करत असतात. या वारंवार पारंपारिक पद्धतीच्या उपयोगामुळे अध्ययन-अध्यापन हे शिक्षक व विद्यार्थ्यांना कंटाळवाणे वाटते व त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या संपादणूकीवर होतो. अध्ययन-अध्यापन कंटाळवाणे होऊ नये, तसेच अध्यापन परिणामकारक होण्यासाठी अध्यापन प्रतिमानाचा वापर करता येऊ शकतो. अध्यापन प्रतिमाने २४ आहेत. यात अग्रत संघटक, संकल्पना प्राप्ती प्रतिमान, भूमिकापालन प्रतिमान इ. प्रतिमाने आहेत. शालेय स्तरावर हिंदी विषयाचे अध्यापन करण्यासाठी भूमिका पालन प्रतिमानाचा उपयोग केला तर त्याचा विद्यार्थ्यांच्या संपादणूकीवर कसा परिणाम होईल हे अभ्यासण्यासाठी संशोधकाने 'माध्यमिक स्तरावरील हिंदी विषयासाठी भूमिकापालन प्रतिमानाद्वारे विद्यार्थ्यांच्या अध्ययन परिणामकारकतेचा अभ्यास' हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

## २. संशोधन समस्येचे विधान

माध्यमिक स्तरावर हिंदी विषयासाठी भूमिकापालन प्रतिमानाद्वारे अध्ययन परिणामकारकतेचा अभ्यास.

## ३. कार्यात्मक व्याख्या

### १) माध्यमिक स्तर

प्राथमिक स्तर व महाविद्यालयीन स्तर यांना जोडणारा दुवा म्हणजे माध्यमिक स्तर होय.

### २) हिंदी विषय

शालेय उच्च माध्यमिक स्तरावर द्वितीय भाषा म्हणून अध्ययन-अध्यापन केला जाणारा विषय.

### ३) भूमिकापालन प्रतिमान
दुसऱ्या व्यक्तीच्या भावना समजून घेऊन त्या व्यक्तीच्या भूमिकेत शिरून त्या व्यक्तीच्या भावना प्रकट करणे.

### ४) अध्ययन परिणामकारकता
अध्यापन झाल्यावर त्याचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर होणारा अनुकूल परिणाम म्हणजे अध्ययन परिणामकारकतेचा अभ्यास.

## ४. संशोधनाची उद्दिष्टे
१) माध्यमिक स्तरावर हिंदी विषय अध्यापनासाठी पारंपारिक पद्धती वापरणे.
२) माध्यमिक स्तरावर हिंदी विषय अध्यापनासाठी भूमिकापालन प्रतिमानाचा वापर करणे.
३) माध्यमिक स्तरावर हिंदी विषय अध्यापनासाठी पारंपारिक पद्धती व भूमिकापालन प्रतिमानाच्या परिणामकारकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

## ५. संशोधनाची कार्यपद्धती
### अ) संशोधन पद्धती
प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

### ब) नमुना निवड
प्रस्तुत संशोधनासाठी बार्शी तालुक्यातील १५ माध्यमिक शाळांपैकी एका माध्यमिक शाळेची निवड संभाव्यतेवर आधारित सुगम यादृच्छिक नमुना पद्धतीतील लॉटरी पद्धतीने करण्यात आली.

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या शाळेतील इयत्ता ९ वी च्या ४० विद्यार्थ्यांची निवड संभाव्यतेवर आधारित सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीतील लॉटरी पद्धतीने करण्यात आली.

### क) संशोधनाची साधने
प्रस्तुत संशोधनासाठी उत्तरचाचणी ही इयत्ता ९ वी च्या हिंदी विषयातील पाठ्यघटकावर आधारित २० गुणांची तयार करण्यात आली. ही चाचणी प्रायोगिक व नियंत्रित गटास अध्यापनानंतर देण्यात आली.

## ६. माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन
प्रस्तुत संशोधनात अध्यापन परिणामकारकता पाहण्यासाठी विद्यार्थ्यांना चाचणी देण्यात आली. चाचणीद्वारे प्राप्त गुणांच्या आधारे अर्थनिर्वचन करण्यात आले.

**सारणी क्र. १**
**उत्तरचाचणीमध्ये नियंत्रित गट व प्रायोगिक गटातील विद्यार्थ्यांच्या प्राप्त गुणांच्या मध्यमानातील सार्थकता स्तरातील फरक दर्शविणारी सारणी**

| मापन | नियंत्रित गट | प्रायोगिक गट |
|---|---|---|
| विद्यार्थी संख्या (N) | २० | २० |
| मध्यमान (M) | १७.०० | १३.०० |
| प्रमाण विचलन (σ) | १.२६ | १.७२ |
| मध्यमानातील फरक (D) | ०.६६ | |
| t-मूल्य | १०.०५* | |
| स्वाधिनता मात्रा (df) | ३८ | |

* ०.०१ या सार्थकता स्तरावर सार्थक आहे.

प्रायोगिक व नियंत्रित गटातील विद्यार्थ्यांच्या उत्तर मिळालेल्या गुणांच्या मध्यमानातील फरक ४ इतका आहे. हा फरक योगायोगाने आला की प्रायोगिक पद्धतीमुळे आला हे t-मूल्यावरून लक्षात येते. प्रायोगिक पद्धतीमुळे आलेले t-मूल्य ०.०५ व ०.०१ या सार्थकता स्तरावर सार्थक आहे कारण प्राप्त t-मूल्य हे स्वाधिनता

मात्रा ३८ साठी नमुना t-मूल्य २.०२१ व २.७०४ यापेक्षा अधिक आहे. म्हणजेच पारंपारिक पद्धतीने केलेल्या अध्यापनापेक्षा भूमिकापालन प्रतिमानाचा वापर करून केलेले अध्यापन परिणामकारक ठरते.

### ७. निष्कर्ष

१) नियंत्रित व प्रायोगिक गटातील विद्यार्थ्यांच्या उत्तर चाचणीतील प्राविण्यात फरक जाणवतो.

२) प्रायोगिक गटातील विद्यार्थ्यांचे उत्तर चाचणीतील प्राविण्य नियंत्रित गटातील विद्यार्थ्यांच्या उत्तर चाचणीतील प्राविण्यापेक्षा अधिक आहे.

३) प्रायोगिक गटातील विद्यार्थ्यांच्या संपादणूकीत प्रायोगिक उपचार मात्रामुळे वाढ झाली.

### ८. शिफारशी

१) माध्यमिक स्तरावर हिंदी विषयाच्या अध्यापनात पारंपारिक पद्धतीबरोबरच आधुनिक पद्धतीचा अवलंब करावा.

२) आधुनिक पद्धती म्हणून अध्यापनाची प्रतिमाने वापरावीत.

३) हिंदी विषयाचे अध्यापन मनोरंजक व परिणामकारक करण्यासाठी अध्यापनात प्रतिमाने वापरावीत.

४) माध्यमिक स्तरावर अध्यापनासाठी म्हणून अध्यापन प्रतिमानाचा शिक्षकांनी वापर करावा.

### संदर्भ ग्रंथसूची -

१. कदम, चा.प. व चौधरी. वा. आ. (२००८). *शैक्षणिक मूल्यमापन*, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

२. पाटील, गितांजली (२००५). *भूमिकापालन प्रतिमान*, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

३. पंडित, ब. वि. (२००७). *शिक्षणातील संशोधन*, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

४. येवले, सीमा (२००६). *शैक्षणिक तंत्रविज्ञान व माहिती तंत्रज्ञान*, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

५. मुळे, रा. शं. व उमाटे, वि. तु. (१९८७). *शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे*, नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ संच निर्मिती मंडळ.